# नियमित इक्विटी गुंतवणुकीतून भांडवलनिर्मितीचा फुलवा वटवृक्ष



**आज कमावलेला एक रुपया हा उद्याचे एक कोटीचे बीजभांडवल आहे. संपत्तीनिर्मितीसाठी आर्थिक साक्षरता वाढविण्याकरिता इक्विटीतील गुंतवणूक हा सर्वांत सुलभ मार्ग ठरतो. हा काहीसा मॅरेथॉन म्हणजे दीर्घ शर्यतीचा प्रकार आहे. लवकर सुरवात करून वेगात सातत्य राखणे, ही युक्ती आहे. एका भरीव नफ्यासाठी गुंतवणूक दहा वर्षे लवकर सुरवात केल्यास तरुणांचा पैसा अनेक पटीने वाढतो. फक्त तुमच्या पॉकेट मनीमधून दरमहा पाचशे/एक हजार रुपयांचे भांडवल बाजूला काढण्याची गरज आहे.**

बी. गोपकुमार

**नियमित गुंतवणूक**

हल्ली युवावर्गाला त्यांच्या पालकांकडून खर्चासाठी बऱ्यापैकी रक्कम मिळते; परंतु यातील बहुतेक सगळेच पैसे मित्र-मैत्रिणींबरोबर धमाल करण्यासाठी खर्च केले जातात. पिझ्झा खाणे, सिनेमा, क्लबमध्ये मस्ती-मजा करण्यासाठी नक्की किती पैसे वाया घालवता, याचा कधी तरुण मुले विचार करतात? बरीचशी तरुण मुले धूम्रपानासारख्या वाईट सवयींवरदेखील पैसे उडवतात. महिनाभरातील खर्चाच्या फक्त १० टक्के पैसे वाचवून केवळ पाचशे रुपयेदेखील म्युच्युअल फंडात गुंतवू शकता. राकेश झुनझुनवाला किंवा वॉरेन बफेटसारख्या गुंतवणूक क्षेत्रातील मोठ्या प्रस्थांची नावे तुम्ही ऐकली आहेत का? या सर्वांनी अगदी लहान वयातच शेअर्समध्ये पैसे गुंतवायला सुरवात केली होती. यामुळेच त्यांच्या एकूण संपत्तीत मोठा फरक झाला. फंड मॅनेजरने निवडलेल्या स्टॉक संग्रहात म्युच्युअल फंड सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) मुळे नियमित पैशांची बचत आणि गुंतवणूक करण्याची संधी मिळते.



हल्ली पैसे घेऊन ज्या प्रकारे लग्न सोहळ्याचे नियोजन केले जाते त्या प्रकारेच तुम्ही म्युच्युअल फंडाचा विचार करा. तिसरीच कोणीतरी व्यक्ती खूप कष्ट घेते आणि आपण आरामात बसून त्या सोहळ्याचा आनंद उपभोगतो. म्युच्युअल फंडात केवळ पाचशे रुपये गुंतवून त्यावर चांगला परतावा मिळू शकतो. गेल्या पाच वर्षांत फंडामुळे दर वर्षी साधारण १५-२० टक्के सहजपणे मिळाले आहेत. जर दर वर्षी फंड २० टक्क्यांनी वाढला तरीदेखील केवळ पाचशे रुपयांच्या 'एसआयपी'मुळे ४८ महिन्यांनंतर तुमची गुंतवणूक जवळपास दुप्पट होऊ शकते. जर एखाद्या महिन्यात केवळ एका आठवड्यात तुम्ही पिझ्झा खाल्ला नाही तर पाचशे रुपये सहज वाचवता येतात.

**एखाद्या व्यापाऱ्याप्रमाणे विचार करा**

जोखीम उचलण्याची तुमची तयारी असेल, तर स्टॉक्समध्ये ट्रेडिंग करून नफा कमावता येतो. तरुण पिढी दररोज केवळ १५-२० मिनिटे देऊन सहजतेने स्टॉक्समध्ये ट्रेडिंग करू शकतात. मोबाईल ट्रेडिंग ॲप्सच्या मदतीने शेअर मार्केट ट्रेड शक्य झाले आहे. हल्ली तरुण गुंतवणूकदार हे चांगल्या ब्रोकर्सची मदत घेतात. यामुळे त्यांना त्यांच्या इच्छेनुसार संशोधनही करता येते आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापरही करता येतो. वेब, मोबाईल आणि ॲप्सवर आधारित ट्रेडिंगमुळे कधीही अगदी सोप्या पद्धतीने हे काम करता येते. ब्रोकर्सकडून केल्या जाणाऱ्या अभ्यासपूर्ण संशोधन सूचना आणि विश्लेषण यामुळे अनेक विद्यार्थी स्टॉक ट्रेडिंग खूप गांभीर्याने घेत आहेत. आपण जितक्या लवकर ट्रेडिंग करायला लागतो तितक्याच लवकर ट्रेडिंगमधील चुका कमी करण्याची आपली क्षमता वाढते. वयाच्या तिशीनंतर थेट इक्विटीमध्ये गुंतवणूक करून जोखीम पत्करण्यापेक्षा विशीच्या सुरवातीला जोखीम उचलण्याची क्षमता जास्त असते. गुंतवणूकदाराला इक्विटी ट्रेडिंग जमू लागले, की ते चलन आणि कमोडीटीज् यांसारख्या इतर मालमत्तेच्या बाबतीत थोडासा धाडसी निर्णय घेऊन त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये विविधता आणण्याची जोखीम उचलू शकतात. तुम्ही जितक्या लवकर स्टॉक गुंतवणूक आणि ट्रेडिंगला सुरवात केली असेल तितका उच्च परतावा मिळायला मदत होईल.

## स्टॉकमध्ये एसआयपी

जर तरुणांनी अगदी कमी किमतीचा म्हणजे शंभर रुपयांचा शेअर खरेदी केला आणि जर तो १२५ रुपयांना विकला, तर तुम्ही प्रत्येक शेअरमागे २५ रुपयांचा नफा कमावू शकता. जर शंभर शेअर्स खरेदी केले असतील तर एकाच व्यवहारात २५०० रुपयांचा नफा मिळू शकतो. लग्न सोहळ्याच्या नियोजनाप्रमाणे तुमच्या 'एसआयपी'साठी कोणता स्टॉक घ्यायचा, हे म्युच्युअल फंड ठरवतो. आजच्या तरुण पिढीला किती पैसे गुंतवायचे, कोणत्या ठिकाणी गुंतवायचे आणि त्यापोटी किती फायदा होणार, हे सर्व काही ठरविण्याची इच्छा असते. थोडक्यात म्हणजे, त्यांना त्यांचा फंड मॅनेजर व्हायचे असते. हे 'एसआयपी'मुळे शक्य होऊ शकते. म्युच्युअल फंडासाठी ज्या प्रकारे म्युच्युअल फंड एसआयपीचे कार्य चालते, त्याचप्रकारे स्टॉक एसआयपीमुळे नियमित कालावधीनंतर पूर्वनियोजित प्रमाणात स्टॉक खरेदी करण्याची मुभा मिळते. जर तुम्ही हे एका ठराविक कालावधीसाठी केले, तर तुम्ही सहजतेने सरासरी कमी किमतीत जास्त शेअर खरेदी करू शकता. जेव्हा शेअर्सच्या किमतीत वाढ होते तेव्हा तुम्ही जास्त फायद्याची अपेक्षा करू शकता. ज्या स्टॉकवर लक्ष केंद्रित करायचे आहे तो निवडणे आणि दर महिन्याला त्यात एक ठराविक छोटी रक्कम गुंतवत राहणे, हेच करायचे आहे. अशा प्रकारे गुंतवणूक करून तरुण भावी झुनझुनवाला किंवा बफेट नक्की बनू शकतात. ज्या प्रकारे उत्तम आरोग्यासाठी दररोज व्यायाम हवाच, त्याचप्रमाणे काही ठराविक स्टॉक्सवर नियमित लक्ष देऊन त्यात गुंतवणूक करत राहणे आवश्यक आहे.

**(लेखक हे रिलायन्स सिक्युरिटीचे सीईओ आहेत.)**